# नल-दमयंती

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A35

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**नल-दमयंती : डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १००/-

# नल-दमयंती

# १

त्या वेळी चारी दिशांना ख्यातनाम असलेल्या विदर्भ देशात भीम नावाचा राज्य राज्य करीत होता. तो अतिशय पराक्रमी आणि प्रजाप्रिय होता. त्याला सर्व प्रकारची सुखे असूनही एका सुखाला तो पारखा झाला होता. त्याला संतती नव्हती.

संतती व्हावी म्हणून त्याने त्या काळच्या प्रथेप्रमाणे अनेक यज्ञ केले होते. पण त्याची इच्छा सफल होईना. मध्यंतरी काही वर्षे अशाच प्रयत्नात गेली.

पुढे त्याच्याकडे एकदा दिमन नामक ब्राह्मण आला. तेव्हा भीम राजाने त्याचा बहुमान केला. मनोभावे त्याची सेवा केली. त्या सेवेने संतुष्ट होऊन दिमन मुनींनी त्याला वर दिला–

''तुला उत्तम प्रकारचे असे तीन पुत्र आणि एक कन्या होईल. या कन्येमुळे तुझ्या कुलाचा उद्धार होईल. तिचे नाव या पृथ्वीवर नेहमी गाजत राहील.''

दिमन मुनींनी दिलेला 'वर' लवकरच प्रचितीला आला.

भीम राजाला दम, दमन आणि दान्त असे तीन पराक्रमी पुत्र झाले व जगद्विख्यात आणि अत्यंत शुभलक्षणी व सुंदर अशी दमयंती ही कन्या झाली.

दमयंती वाढू लागली तशी तिच्या गुणांची आणि अनुपम सौंदर्याची ख्याती चारी दिशांना पसरू लागली.

विदर्भ देशाधिपती भीम राजाने आपल्या या सुंदर, गुणी, बुद्धिमान लाडक्या कन्येसाठी राणी महालाच्या मागील बाजूस असलेल्या विस्तीर्ण बगिच्यात एक

तलाव बनवून घेतला होता आणि त्यात हंसाची एक सुंदर जोडी आणून ठेवली होती. साधे नव्हे, अगदी अस्सल राजहंस होते.

ती राजहंसाची जोडी पाहून दमयंती खूश होऊन गेली. आपल्या सख्यांबरोबर ती सकाळ-संध्याकाळचा बराच वेळ त्या राजहंस पक्ष्यांबरोबर घालवी.

ते राजहंस आता मोठ्या धीटपणाने पाण्याबाहेर पडून तिच्या जवळ येऊन बसत. क्रीडा करीत. कधी उडून तिच्या खांद्यावर बसत, तर कधी आकाशात झेप घेऊन उडत राहात व मग हलकेच खाली उतरून तिच्याजवळ येत. मग तिच्या आज्ञा ऐकून तलावात बुड्या मारीत पोहत राहात.

त्यांची क्रीडा बघण्यात दमयंती आपल्या सख्यांसह रंगून जाई.

एक दिवस दमयंती रोजच्या क्रमाप्रमाणे सायंकाळी आपल्या सख्यांबरोबर गुजगोष्टी करीत राजहंसांशी खेळत बसली होती. सख्यांशी बोलत होती. तेवढ्यात एक बाण आकाशातून खाली येऊन थेट तिच्या पायाजवळ पडला. आश्चर्याने ती आणि तिची सखी त्या बाणाकडे बघत राहिल्या. बाण येताना दिसला नाही. जणू आकाशातून अलगद पडला. दोघींनी सभोवार पाहिले. छे! कुठेही कुणी नव्हतं.

''अं! सखे, अगं आकाशातून तर हा बाण पडला नाही?''

तिच्या सखीने चेष्टेने म्हटले, ''असेल बाई! कारण तुझ्या सौंदर्याची आणि बुद्धिमत्तेची ख्याती थेट इंद्रलोकी पोहोचली असणार!''

''हो. अन् बाण नेमका तुझ्याच पुढ्यात पडावा! निश्चितच इंद्रलोकीचा हा बाण आहे.''

तिच्या सखीने तो बाण उचलला आणि मोठ्या आश्चर्याने ती उद्गारली, ''अगंबाई! पाहिलंस का?''

''काय?''

''या बाणाला अडकवलेलं हे कमलपुष्प! पुष्प नव्हे कमलकळीच आहे ही!''

बोलता बोलता त्या कमलकळीच्या पाकळ्या उघडल्या.

''अगंबाई! पाहा ना! या अर्धवट उमललेल्या पाकळ्यांवर लिहिलंय ''निषधाधिपती नल!''

''होय, दमयंती सखे, माझे तात नलराजाची नेहमी स्तुती करीत असतात. त्याच्या शौर्याची-त्याच्या सौंदर्याची.''

दमयंतीचे सखीच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. ती अजूनही त्या बाणाकडेच पाहात होती.

तिच्या सखीने आनंदित होऊन मोठ्या कौतुकाने म्हटले,

''दमयंती- राजकन्ये, ज्या बाणाने त्याने चौफेर पृथ्वी जिंकली त्या बाणाने तो तुलाही जिंकू इच्छितो.''

काही न बोलता दमयंती किंचित हसली.

तिची नजर अजूनही त्या बाणावरच खिळलेली होती.

सखीने म्हटले, ''राजकन्ये, सखे दमयंती, या प्रीतीचा अव्हेर करू नकोस. अगं, या पृथ्वीवर त्याच्यासारखा अत्यंत देखणा, शूर, वेदवेत्ता, सत्यवादी, अक्षौहिणी सैन्याचा अधिपती, ब्राह्मणांचा नित्य मान राखणारा, उदार, जितेंद्रिय दुसरा कोणी राजा नाही.''

दमयंती तिच्याकडे पाहून हसली आणि मग म्हणाली,

''कळलं.''

''सखे, ज्या अर्थी हा बाण नेमका इथं तुझ्या पुढ्यात पडला आहे, त्या अर्थी त्याचा हा सूचक संदेशच आहे हे काही मी तुला सांगायला नको.''

दमयंती काही न बोलता किंचित हसली. अजूनही तिची नजर त्या बाणावरच खिळलेली होती.

सखीने म्हटले, ''सखे राजकन्ये, ज्या अर्थी हा बाण नेमका तुझ्या पुढ्यात येऊन पडला, हा सूचक संदेश त्याने तुला पाठवलाय त्या अर्थी तो शिकारीच्या निमित्ताने इकडे आला आहे.''

''निश्चितच! हिच्या सौंदर्याची, बुद्धिमत्तेची कीर्ती त्याच्या कानी निषध देशापर्यंत पोहोचली असणारच.''

''आणि म्हणूनच शिकारीच्या निमित्ताने तो इथे आला असणार.''

''अगदी उघडच दिसतंय हे! नाहीतर हा बाण कमलपुष्प घेऊन नेमका हिच्या पायाशी कसा पडला असता गं?''

''माझे तात नेहमी त्याची स्तुती करतात.''

''तुझे तात ओळखतात त्याला?''

''तशी प्रत्यक्ष ओळख-परिचय नाही. पण माझी एक आत्या निषध देशात दिलेली आहे. माझे तात तिला माहेरपणाला आणण्यासाठी अधून मधून जातात. आपल्या विदर्भ देशासारखाच 'निषध' देशही सुखी आणि समृद्ध आहे. निषध देशाची राजधानी 'अलकापुरी'.''

दमयंतीने किंचित हसून चेष्टेने म्हटले,

''सखे, तू इंद्राच्या इंद्रपुरीचं वर्णन करते आहेस.''

''होय. अगं, निषध देशाची राजधानी 'अलकापुरी' ही या पृथ्वीवरील इंद्रपुरीच आहे, असे माझे तात सांगतात.''

''असं?''

''सखे, निषध देशाचा हा अधिपती अत्यंत देखणा, शूर आहे. तो नुसताच शूर नाही तर वेदवेत्ता, ब्राह्मणप्रिय, उदार आणि जितेंद्रिय आहे. अक्षौहिणी सैन्याचा तो अधिपती आहे. त्याच्या प्रजेला तो अत्यंत प्रिय आहे.''

आपल्या सखीचे ते बोलणे दमयंती अगदी एकचित्ताने ऐकत होती.

''सखी दमयंती, तुझ्या अनुपम सौंदर्याची आणि गुणांची ख्याती ऐकून मोठ्या चातुर्याने आणि रसिकतेने हे कमलपुष्प पाठवून त्याने आपले मनोगत व्यक्त केले आहे. आपलं हृदय तुला अर्पण केलं आहे, हे तुझ्या केव्हाच लक्षात आलं आहे, हे आम्ही जाणून आहोत.''

दमयंती काही न बोलता किंचित हसली.

सखीने म्हटले, ''दमयंती, सखे, निषध देशाचा अधिपती नल राजासारखा पती मिळणे ही महान भाग्याची गोष्ट आहे.''

दुसऱ्या सखीने म्हटले, ''हो ना! मोठ्या चातुर्याने त्याने आपलं प्रेम प्रकट केलं आहे. खरंच, तू फार भाग्यवान आहेस.''

दुसरीने म्हटलं, ''हो खरंच! आणि ज्याला दमयंतीसारखी अत्यंत सुंदर, बुद्धिमान पत्नी प्राप्त होईल तोही परम-भाग्यवान!''

''निश्चितच.'' सगळ्या एका सुरात उद्गारल्या.

सख्या बोलत होत्या आणि दमयंती त्या बाणाकडे पाहात त्यांचे बोलणे ऐकत होती. तिचे मन नकळत त्याच्याकडे खेचले जात होते.

तिने हलकेच ते कमलपुष्प हाती घेतलं आणि आपल्या हृदयाशी धरलं. तिचं हृदय थरथरलं.

प्रीती-प्रीती म्हणतात ती हीच का? माझ्या हृदयात आता दाटलेल्या अननुभूत भावनांना- विचारांनाच का प्रीती म्हणतात?

सगळ्यांच्या स्तुतीला पात्र झालेला निषधाधिपती नलच आपणास पती मिळावा हे आपले भाग्यच!

दमयंतीचं हृदय आता नल राजानं व्यापून टाकलं होतं. तिच्या हृदयी, ध्यानीमनी आता एकच मूर्ती अढळ स्थान घेऊन बसली होती - नल राजाची.

आता पूर्वीचा तिचा खेळकरपणा नाहीसा झाला. ती आता गंभीर बनली. तासन् तास एका ठिकाणीच बसून राहू लागली. खाण्यापिण्यावरून तिचं लक्ष उडालं. पूर्वीचा खेळकरपणा गेला. ती आपल्याच विचारात गढून जाऊ लागली.

तिच्या मातेच्या लक्षात तिची ही स्थिती आली.

एक दिवस राजाला तिने म्हटले, ''दमयंती आता विवाहयोग्य झाली आहे. तेव्हा तिचं स्वयंवर आता लवकर करावं.''

''हो, मलाही तेच वाटते. तेव्हा आता लवकर तिचा विवाह करण्याच्या तयारीला मी लागतो.''

✦✦✦

# २

भीम राजा कन्या दमयंतीच्या स्वयंवराच्या तयारीला लागला.

त्याने चारी दिशांच्या राजांना स्वयंवराची निमंत्रणे पाठवली. त्यांच्या राहण्यासाठी सर्व सुविधा असलेली घरे उभारली. त्या सर्वांची उत्कृष्ट व्यवस्था ठेवली.

राजकन्या दमयंतीच्या अनुपम सौंदर्याची आणि तिच्या प्रगाढ बुद्धिमत्तेची चारी दिशांना ख्याती पसरलेली होती.

त्यामुळे निमंत्रण मिळताच दमयंतीला मिळविण्याची ईर्ष्या बाळगून सर्व राजे लोक विदर्भ देशी जमले. त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे खास बांधलेल्या राजगृहात सर्वांची यथायोग्य व्यवस्था करण्यात आली.

दमयंतीचे स्वयंवर होणार हे वृत्त इंद्रलोकीही पोचले. सर्वत्र संचार करणाऱ्या नारदमुनीकडून इंद्रलोकी ते कळले.

दमयंतीच्या स्वयंवराला चारी दिशांच्या राजे-राजपुत्रांची मोठी दाटी झाली होती. हे सर्व राजे, राजपुत्र आपल्या नशिबाची परीक्षा देण्यासाठी आणि देवांनाही दुर्लभ अशी राजकन्या दमयंती कुणाच्या गळ्यात वरमाला घालते हे पाहण्यासाठी आपल्या नशिबाची परीक्षा घेण्यासाठी आले होते. स्वयंवर-मंडपात मोठी दाटी झाली होती. इंद्रलोकीचा इंद्र आणि अन्य देवही आले होते. हे वृत्त तिला कळले तेव्हा मनातून दमयंती काहीशी घाबरून गेली होती.